# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३६४/२०२४ दिनांक ०१/१०/२०२४

## प्रेस नोट

### "३५,३६,०००/- रुपये किंमतीचा ८८४ ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगणाऱ्या आरोपीत यास अटक करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश."

दिनांक २०/०९/२४ रोजी पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार पोलीस ठाणे हद्दीत गस्त करत असतांना १८:४५ वा. चे सुमारास गस्त करत ग्रीन वसई नर्सरी जवळ, उमरकंपाऊन्ड, मुंबई अहमदाबाद हायवे रोडचे लगत, सोपाराफाटा, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि.पालघर येथे आले. सदर ठिकाणी एक इसम संशयीत रित्या हातात निळया रंगाची पिशवी घेऊन उभा असल्याचे दिसुन आल्याने पोलीस पथकाने सदर इसमास ताब्यात घेऊन त्यांची दोन पंचांसमक्ष झडती घेतली. त्यांच्या ताब्यात ८८४ ग्रॅम वजनाचा ३५,३६,०००/- रुपये किंमतीचा काळपट तपकीरी रंगाचा उग्र वास असलेला चरस हा अंमली पदार्थ मिळुन आला आहे.

सदरबाबत पेल्हार पोलीस ठाणे येथे पो.अं./२२०२६, सुजय सुधाकरराव पाटील वय -२७ वर्षे, नेम. पेल्हार पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी प्रथम खबर दिली असुन आरोपीत सुधीरकुमार श्रीदेवीप्रसाद शर्मा वय-३७ वर्षे, रा. प्रतापगंज, राज्य-उत्तरप्रदेश यांच्या विरोधात गु.र.क्र. ७०९/२०२४ गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २२(ब) ाा (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, वाल्मीक पाटील, मिथुन मोहिते पो.अं./रवि वानखेडे, निखील मंडलिक, किरण आव्हाड, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




---ooo---